अंशदान व ठेव घेऊन केलेल्या
बांधकामाचे उपयोगिता प्रमाणपत्रे
उपभोक्ता विभागास पाठविण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
परिपत्रक क्रमांक-बीडीजी.११९९/प्रक्र.१९९ भाग-१/इमा.३
दिनांक : २४.११.२००५

राज्य शासनाचे बरेच विभाग उदा.गृह विभाग, आदिवासी विकास विभाग, पशुसंवर्धन व मत्स्य व्यवसाय विभाग व अन्य विभागांकडून त्यांच्या कामाकरिता केंद्र शासनाकडून विविध योजनातून प्राप्त होणारा निधी ठेव अंशदान म्हणून संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे ठेवला जातो. सदर कामे संबंधित सा.बां. विभागांमार्फत महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद २९९ ते २०५ मधील तरतुदींनुसार केली जातात. ही सर्व प्रक्रिया संबंधित विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे स्तरावर होत असल्याने, त्याबाबत मंत्रालय स्तरावर सा.बां.विभागास कांहीही माहिती उपलब्ध नसते. अशा सर्व योजनांचा वेळोवेळी आढावा घेतला जातो. अशा सर्व आढावा बैठकीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त न झाल्यामुळे, महाराष्ट्र राज्याला केंद्र शासनाकडून उर्वरित निधी वितरित होत नाही व त्यामुळे कामात अडचणी येतात असे मत बऱ्याच सचिवांनी व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद ३०४(५) मधील तरतुदींनुसार अशा कामांवरील खर्च मिळालेल्या अंशदानाच्या रकमेच्या मर्यादीत असेल, त्यावेळी विहीत केलेल्या नमुन्यात दर ३ महिन्यांनी व अंशदानापेक्षा अधिक खर्च अपेक्षित असेल तर, खर्च विनियमित होईपर्यंत, दरमहा, ठेवीदारांना कार्यकारी अभियंत्यांकडून खर्चाचे विवरणपत्र पाठविणे आवश्यक आहे. तथापि, शासनाचे असे निदर्शनास आले आहे की, ठेवीदारांना कार्यकारी अभियंत्यांकडून खर्चाचे विवरणपत्र नियमितपणे पाठविले जात नाही. यापुढे प्रत्येक अंशदान ठेव घेऊन, हाती घेतलेल्या कामांच्या खर्चाची विवरणपत्रे सा.बां.नियम पुस्तिकेतील परिच्छेद ३०४ मधील विहीत नमुन्यात तसेच उपयोगिता प्रमाणपत्रे दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत न चुकता, संबंधित ठेवीदारांस /संबंधित विभागांस पाठविण्यांत यावीत व त्याची प्रत संबंधित अधीक्षक अभियंता यांना सादर करण्यांत यावी. सर्व अधीक्षक अभियंता यांनी आपल्या मंडळातील प्रत्येक विभागामधील अंशदान ठेव घेऊन केलेल्या प्रत्येक बांधकामाची खर्चाची विविरणपत्र/उपयोगिता प्रमाणपत्रे कोणत्या दिनांकास संबंधित ठेवीदारास/विभागास पाठविण्यांत आली याबाबतचा अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्रात संबंधित मुख्य अभियंता यांचेकडे तसेच शासनास अवर सचिव(इमारती) दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत न चुकता सादर करावा. याप्रमाणे कार्यवाही होते किंवा नाही याबाबत विभागाचे व मंडळाचे वार्षिक तपासणीचे वेळी अनुक्रमे अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांनी पाहणी करावी. सदर सूचनांनुसार जे कार्यकारी अभियंता दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत खर्चाचे विवरणपत्र/उपयोगिता प्रमाणपत्र पाठविणार नाहीत, त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव संबंधित अधीक्षक अभियंता यांनी त्वरित कार्यान्वयीत करावा.

( मा.आ.गांगुर्डे )
उपसचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत......

प्रत-

सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुख, मंत्रालय, मुंबई
सर्व मुख्य अभियंता (विद्युतसह) सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व अधीक्षक अभियंता (विद्युतसह) सार्वजनिक बांधकाम मंडळे
सर्व कार्यकारी अभियंता (विद्युतसह) सार्वजनिक बांधकाम विभाग
निवड नस्ती (इमा.३), सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई

अंशदान व ठेव घेऊन केलेल्या बांधकामांचे माहे........./२००५ अखेरचे
उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्याचे विवरणपत्र

प्रादेशिक विभाग.....................................

मंडळाचे नांव ..........................................

| अ.क्र. | विभाग | कामाचे नांव व प्राप्त झालेले अंशदान/ठेव (विभागनिहाय) | माहे...../२००५ मध्ये झालेला खर्च<br>अद्यायावत खर्च | उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | सा.बां.विभाग क्र.१ | गृह विभाग<br>१)<br>२)<br>३)<br><br>आदिवासी विभाग<br>१)<br>२) | | |
| २) | सा.बां.विभाग क्र.२ | | | |
| ३) | वि.प्र.विभाग | | | |